दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम | बुधवार, ०१ एप्रिल २०२६ | वर्ष : २ | अंक : ३५० | पाने : ४ | किंमत : ५ रूपये | Title code:- MAHMUL039353

## मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा

### नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन



**मुंबई :** भारतीय हवामान खात्याच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार आज मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

हवामान खात्याने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आला की तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असेही सांगण्यात आले आहे.

प्रशासनाने ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे.

दरम्यान, शेतकरी बांधवांनी विजेच्या इशाऱ्याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वत्तीने कळविण्यात आले आहे.

## हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग – मुख्यमंत्री



**मुंबई :**महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

**राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते.

महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे.

**नागपूर ग्रामीण भागात मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश**

महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, अमरावती, अकोला, लातूर, धाराशिव, सोलापूर, जळगाव, सिंधुदुर्ग, नांदेड, ठाणे, पालघर, नंदुरबार, सोलापूर आणि यवतमाळ या १८ जिल्ह्यात या रोगाचा प्रादुर्भाव आहे. फेब्रुवारी २०२६ च्या ताज्या अहवालानुसार, महाराष्ट्रातील हत्तीरोगाच्या एकूण प्रकरणांपैकी सुमारे ७५ टक्के रुग्ण एकट्या नागपूर विभागात आहेत. सर्वाधिक प्रभावित पाच जिल्हे: भंडारा, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली आणि गोंदिया.

ट्रीपल ड्रग पॉलिसी (आयडीए) यशाचा दर: नागपूर ग्रामीण भागात या मोहिमेमुळे सूक्ष्मजंतूंचा प्रसार दर ( एमएफ रेट) २०१४ मधील ४.९१ टक्क्यावरून २०२४ पर्यंत एक टक्क्यापेक्षा कमी आणण्यात यश आले आहे.

तज्ज्ञांच्या मते, 'आयडीए' उपचारामुळे मायक्रोफिलेरिया (परजीवी) कमी करण्यास अधिक परिणामकारक मदत होते, त्यामुळे रोगाचा प्रसार लवकर थांबवता येतो. राज्य शासनाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अफवांवर विश्वास न ठेवता आरोग्य कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली ही औषधे घ्यावीत. समाजाच्या सक्रिय सहभागाशिवाय हत्तीरोग निर्मूलन शक्य नसल्याचेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे.

## रेल्वे रस्ता बांधकामामुळे नागरिकांच्या जीवास धोका निर्माण होत असल्यामुळे रस्ता सुरळीत करून धुळीचा बंदोबस्त करा



**प्रशांत ठाणे :** दारव्हा शहरातील रेल्वे रस्त्याच्या कामामुळे बायपास काढलेल्या रस्त्यावरून प्रवाशी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.सदर बांधकाम दोन तीन वर्षांपासून दारव्हा शहरातील रेल्वे स्टेशन व रेल्वेच्या पुलाचे काम दारव्हा ते डोल्हारी मार्गे नेर या रोड रस्त्याकडे जाणाऱ्या मार्गांवर सुरु आहे.बायपास सिमेंट रस्ता केला आहे परंतु दोनशे ते तीनशे मिटर अंतराचा रस्ता मात्र त्यावर सिमेंट न टाकल्यामुळे धुळीने माखला असून त्याठिकाणी खड्ड्याचे साम्राज्य निर्माण झाले असून त्याठिकाणची संपूर्ण गिट्टी बाहेर निघाली असून रस्त्यावर पसरली आहे त्यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.त्यारस्त्यावर डोल्हारी मार्गे नेर व दारव्हा ते तळेगाव हे दोन रस्ते असून त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी वाहन चालकांना रस्ता दिसण्यासाठी मार्गक्रमणाचे फलक लावल्याचे दिसत नाही रस्त्याचे काम सुरु आहे असे फलक चहुबाजूनी मोठ्या प्रमाणात कुठेही दिसत नाही. जर त्याठिकाणी अपघात झाल्यास ह्याला जबाबदार कोण? ह्या अगोदर सुद्धा ऑगष्ट 2025 मध्ये रेल्वेच्या ढिसाळ नियोजनामुळे रेल्वे स्टेशन बांधकामाच्या खड्ड्यात पडून चार मुलांचा बळी घेतला आहे.आणखी रस्ता अपघाताचे कोणी बळी ठरू नये यासाठी रेल्वे प्रशासनासह जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांनी या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित करावे.तसे न झाल्यास त्या मार्गांवरील नागरिकांना सोबत घेऊन व बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल.अशा आशयाचे निवेदन बिमोद विठ्ठलराव मुधाने बहुजन मुक्ती पार्टी

लोकसभा अध्यक्ष यवतमाळ वाशीम यांच्या नेतृत्वात देण्यात आले.तसेच जलील खान, तोहीन खान, गौतम राऊत, आशिफ खान बाबा खान, राजू जाधव, सौरव इंगोले, शेख अहेमद, रेहान खान, पृथ्वीराज चव्हाण, सेजल जाधव, रमेश ढगे, ज्ञानेश्वर मेश्राम अशा अनेकांच्या सह्यानिशी निवेदन देण्यात आले आहे..

## प्रजापिता ब्रम्हा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रभु मिलन केंद्रावर आमदार सईताई डहाके यांचे हस्ते बँक संचालक विश्वनाथ पाटील ताथोड ह्यांचा सन्मान



**नकूल उपाध्ये / कारंजा लाड :** प्रजापिता ब्रम्हा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या प्रभुमिलन अध्यात्मिक केंद्रावर कारंजा येथे दि ३१ मार्च रोजी दि वाशिम अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूकीत धानोरा ताथोड येथील विश्वनाथ पाटील ताथोड संचालक पदी निवडून आल्याबाबत त्यांचा कारंजा मानोरा विधानसभा क्षेत्राच्या लोकप्रीय आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांचे हस्ते ब्रम्हा परिवारातर्फे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ शिवबाबाची प्रतीमा देऊन करण्यात आला .

सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी केंद्राच्या प्रमुख राजयोगी मालती दिदि तर प्रमुख उपस्थीतीत आमदार श्रीमती सईताई डहाके; सत्कार मुर्ती विश्वनाथ पाटील ताथोड;म .राज्य पीएल प्रणीत ग्रामीण पत्रकार संघाचे वाशिम जिल्हा अध्यक्ष राज्य शासन पुरस्कार प्राप्त माजी प्राचार्य अशोकराव उपाध्ये यांची प्रमुख उपस्थीती व्यासपीठावर होती . आमदार श्रीमती सईताई डहाके यांना ओम शांती केंद्रातर्फे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन केंद्राच्या संचालीका राजयोगी बीके मालती दिदि यांनी सन्मानीत केले तर पत्रकार अशोकराव उपाध्ये यांचा सुद्धा भेटवस्तू देत बीके मालती दिदिनी सन्मान केला . याप्रसंगी बोलतांना आमदार श्रीमती सई ताई डहाके म्हणाल्या की विश्वनाथ पाटील प्रामाणीक ईश्वरीय सेवेत असलेले सदाचारी निर्मळ व्यक्तीमत्वाचे धनी असून स्व प्रकाश दादाचे सच्चे खंदे चाहते आहेत . त्यांच्या विजया मुळे एक प्रामाणीक संचालक बँकेवर सेवेसाठी मतदारांनी दिला असून बँकेचे माध्यमातून त्यांना सेवेची संधी मिळाली आहे . याप्रसंगी सत्कार मुर्ती विश्वनाथ पाटील ताथोड; पत्रकार अशोकराव उपाध्ये यांनीही आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र संचालिका मालती दिदि यांनी केले कार्यक्रमाचे संचलन बीके दिलीप भाई ताठे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ निखील भाई कटारीया यांनी केले . पत्रकार संजयभाई कडोळे; प्रदीप भाई वानखडे यांनी सुद्धा बँक संचालक विश्वनाथ पाटील ताथोड आमदार श्रीमती सईताई डहाके यांचा सत्कार केला याप्रसंगी प्रा . शंकरराव पुंड; महादेवराव ताठे; उत्तमराव ताथोड; ईश्वर ताठे; मानोऱ्याहून बबनराव देशमुख साखरकर भाई यांचे सह ब्रम्हा मुख वंशावली परीवाराती भाई बहन यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती . कार्यक्रमाची सांगता उपस्थितांना ब्रम्हा भोजन देऊन करण्यात आली .

## शासन कर्ती जमात होऊनच समाजसेवा करता येते हा आदेश कार्यकर्त्यांना डॉ. रामदासजी आठवले यांनी दिला तो आदेश बुलडाणा रिपाइंने सिरसावध मानून कामला लागले



**बुलडाणा,(प्रतिनिधी) :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाची राष्ट्रीय नेते केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार डॉ. रामदासजी आठवले यांच्या नेतृत्वाखालील देशभर घोडदौड सुरू आहे पण महाराष्ट्रात रिपाइंची जी पहिली ताकद होती नगरपालिका,महानगरपालीका, स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये रिपाइं सत्तेत होती ती ताकद आता राहीली नाही ती ताकद आता राहिलेली दिसत नाही हा खेद व्यक्त केला. ती ताकद निर्माण करण्यासाठी दलीत पँथरसारखी तरूणांची फौज उभी केली पाहीजे. मित्र पक्षांच्या भरोशावर न राहता युती होवो या न होवो. स्वबळावर उमेव्दार उभे करून निवडून आणता आले पाहीजे त्यासाठी संघटन मजबूत करावे त्यासाठी केवळ बौध्दांच्या मतांवर उमेदवार निवडून येणार नाहीत त्यासाठी सोशल इंजिनिअरिंग वापरून सर्व जाती धर्मातील समाजाला सोबत घेऊन पक्ष संघटन मजबूत करून गाव तेथे शाखा,घर तेथे एकनिष्ठ कार्यकर्ता निर्माण करून पक्षाची ताकद वाढवून तेव्हाच शासन करती जमात बनेल व त्यावेळसच समाजाची सेवा करता येईल. म्हणून रिपाइं कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना मजबूत पूर्नबांधणी करा गन्ना किसन धारी मनुष्य या आपल्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवून जिंका व पक्षाची ताकद दाखवा तेव्हाच इतर मित्र पक्ष आपल्याला जवळ करेल त्यासाठी संघटन मजबूत करा असे आवाहन ना.डॉ. रामदासजी आठवले यांनी कार्यकर्त्यांना केले.

ते आवाहन बुलढाणा जिल्हा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीया आठवले गटाने सिरसावध मानुन रिपाइं जिल्हा संपर्क प्रमुख पत्रकार बाबासाहेब जाधव, जेष्ठ नेते समाजभूषण भैयासाहेब पाटील, महीलाध्यक्षा वंदनाताई वाघ, जिल्हा युवाध्यक्ष प्रकाश म्हस्के पाटील,जिल्हासंघटन संपर्क प्रमुख इंजि. शरद खरात, जिल्हाउपाध्यक्ष प्रा. दिलीप खरात, जिल्हा कार्यध्यक्ष प्रा. मुक्तार पठाण, विदर्भ उपाध्यक्ष संजूभाऊ वाकोडे,विदर्भ महीलाउपध्यक्षा आशाताई वानखडे, विदर्भउपाध्यक्ष भाऊसाहेब वानखडे, विदर्भ सचिव दलीत मित्र समाजभूषण विजय सपकाळ सर्वश्री तालुकाध्यक्ष बुलडाणा केशव सरकटे, मोताळा बाळासाहेब आहीरे, चिखली हिम्मतराव जाधव, सिंदखेड राजा भानुदास शेजोळ, पत्रकार विजय भालमोडे, मेहकर पंकज वाघ, राणा मोरे, आवसरमोल यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण जिल्हा भर कार्यकर्त्यांच्या बैठका घेऊन रिपाइं संघटन मजबूत करीत आहे. मैत्रपक्षाची युती होवो या न होवो स्वबळावर पक्षाचे चिन्ह शेतकरी ऊसधारी मानुस निशाणी घेऊन होऊ घातलेल्या मिनी मंत्र्यालयाच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक पंचायत समीती, जिल्हा परिषद निवडणूकीत उमेदवार उभे करून जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणून सत्तेत सहभागी होऊन शासन करती जमात होऊन समाजसेवा करू ही वेळ आली आहे " अभी नही त कभी नही " तर कामला लागा व डॉ. रामदासजी आठवले साहेबांचे जे ध्येय पूर्ण करू शासन करती जमात बनून समाजसेवा करू व डॉ. रामदासजी आठवले साहेबांचे हात बळकट करू

## पाळोदी येथे संत सदाशिव महाराज क्रिकेट क्लब द्वारे प्लास्टिक बॉलचे नाईट चे सामने




**प्रशांत ठाणे :** दारव्हा तालुक्यातील पाळोदी येथे गुरुवार , दि.2 जानेवारी रोजी भव्य प्लास्टिक बॉल स्पर्धेचे आयोजन केले आहे . आतापर्यंत या स्पर्धेत २२ संघांनी नोंदणी केली असून अजूनही नोंदणी सुरू असल्याची माहिती आयोजकांनी दिली. स्पर्धेचे ठिकाण संत श्री सदाशिव महाराज मंदिर मागे असून स्पर्धेची प्रवेश फी 999 रुपये आहे. या स्पर्धेसाठी माजी जी.प.अध्यक्ष राहुलभाऊ ठाकरे यांच्याकडून प्रथम बक्षीस 30001 रु., द्वितीय बक्षीस दारव्हा काँग्रेस कमेटी अध्यक्ष प्रकाशभाऊ नवरंगे 20001 व सरपंच जयेंद्रभाऊ धिरण यांच्याकडून 10001 रू. देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी माजी जी.प अध्यक्ष राहुलभाऊ ठाकरे , सरपंच जयेंद्र धिरण , काँग्रेस तालुकाप्रमुख प्रकाश नवरंगे,यांची उपस्थितीत होणार आहे, स्पर्धेचे आयोजन संत सदाशिव महाराज क्रिकेट टीम यांच्यातर्फे करण्यात आले असून वैभव पानचोरे , सागर ठाकरे ,वैभव पावडे,गोपाल वाडेकर,दिनेश राऊत व हे आयोजक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी पाळोदी येथील मित्र मंडळ यांचे सहकार्य लाभत आहे..

## संपादकीय

### युद्धखोरीची किंमत

सुमारे तीन आठवड्यांपूर्वी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, युद्ध आता लवकरच संपेल, असे म्हटले होते. संपूर्ण जगात या वक्तव्याचे स्वागत झाले आणि जागतिक व्यापारही सुरळीत होईल, अशी आशा व्यक्त झाली. परंतु इस्रायल व अमेरिकेने संघर्ष जारीच ठेवल्यामुळे पुन्हा एकदा निराशेच्या ढगांनी जग झाकोळून गेले. नंतर युद्धविरामाच्या काळातही युद्ध सुरूच होते. आता तर अमेरिकेचे सैन्य पश्चिम आशियात दाखल होत असून, हा संघर्ष आणखी रक्तरंजित होईल, अशीच चिन्हे आहेत. अमेरिकेच्या सैन्याला आगीमध्ये लोटून देण्यासाठी आणि पश्चिम आशियातील अमेरिकेच्या भागीदारांना अद्दल घडवण्यासाठी इराण सज्ज आहे. आम्ही अमेरिकेच्या सैन्याची वाटच पाहात आहोत, असे प्रतिआव्हान इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद कालिबाफ यांनी दिले आहे.

एकीकडे अमेरिका इराणबरोबर वाटाघाटी सुरू असल्याचे माध्यमांना सांगते आणि दुसरीकडे जमिनीवरून हल्ला करण्याची तयारी करते. यामुळे इराण संतापलेला आहे. अमेरिकेस इराणकडून शरणागती हवी असली, तरीदेखील आम्ही कधीही झुकणार नाही, असा हल्लाबोल कालिबाफ यांनी केला आहे. शिवाय हे युद्ध आणखी व्यापक झाले असून, इराणसमर्थित येमेनमधील हुथी बंडखोरांनीदेखील इस्रायलवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ला चढवला आहे. आपण सहज विजय मिळवू, असे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि ट्रम्प यांना वाटत होते. पण तसे घडलेले नाही. तसेच या युद्धात आतापर्यंत तीनशेपेक्षा अधिक अमेरिकन सैनिक जखमी झाले आहेत. आता अमेरिकेत या युद्धास तीव— विरोध होत असून, अमेरिकेच्या सर्वच्या सर्व म्हणजे 50 राज्यांमध्ये 3200 पेक्षा अधिक ठिकाणी युद्धाच्या विरोधात ‘नो किंग्ज’ निदर्शने करण्यात आली. यापूर्वी दोनवेळा आयोजित करण्यात आलेल्या निदर्शनांना लाखो अमेरिकनांनी समर्थन दिले होते. युद्ध सुरू झाल्यापासून करण्यात आलेल्या दोन जनमत चाचण्यांमध्ये ट्रम्प प्रशासनाची लोकप्रियता कमालीची घटल्याचे दिसून आले आहे.

अमेरिकेत होणाऱ्या आगामी मध्यावधी निवडणुकांत रिपब्लिकनांना याचा फटका बसू शकतो. इस्रायल व अमेरिकेने शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचे हल्ले करूनदेखील इराण नमायला काही तयार नाही. त्यामुळे इराणची राजवट बदलून तिथे आपले प्यादे बसवण्याचे अमेरिकेचे स्वप्न पूर्ण होईल, अशी चिन्हे नाहीत. उलट इराणमधील हजारो लोक तेथील राजवटीच्या मागे भक्कमपणे उभे आहेत. इराणमधील वेगवेगळ्या शहरांत अमेरिकेचा व इस्रायलचा जोरदार निषेध केला जात आहे. लढाईत अमेरिकेला अद्याप यश मिळत नसल्यामुळे ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे समर्थकही निराश झालेले आहेत.

न्यूयॉर्क, वॉशिंग्टन डीसी, डलास, फिलाडेल्फिया, लॉस एंजेलिस, सिएटल या सर्व शहरांत जवळपास 90 लाख लोकांनी ट्रम्प यांच्या विरोधात घोषणा दिल्या. यापूर्वी ट्रम्प यांनी अध्यक्ष झाल्यापासून स्थलांतरितांच्या संबंधात राबवलेल्या धोरणाला विरोध म्हणून ‘नो किंग्ज’ आंदोलन झाले होते. आता युद्धामुळे अनेक वस्तू बाजारात मिळेनाशा झाल्या असून, महागाई वाढली आहे. शिवाय हे युद्ध केवळ इराणपुरते मर्यादित नसून, पश्चिम आशियातील अनेक देशांत ते पसरले आहे. इराणमध्ये शाळेत जाणाऱ्या अनेक मुली बॉम्बहल्ल्यात मरण पावल्या. तेहरानमधील इराण युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी या जगद्विख्यात संस्थेचे अतोनात नुकसान झाले आहे. निवासी भागांवर बॉम्ब टाकण्यात आले असून, त्यामुळे हजारो लोक बेघर झाले आहेत. हजारो लहान मुले आणि महिला जखमी झाल्या असून, याआधीच्या अमेरिकेच्या इराक व अफगाणिस्तानमधील युद्धात असेच घडले होते.

एखाद्या देशाच्या दहशतवादास विरोध करताना, तेथील सामान्य जनतेला लक्ष्य करणे चूक आहे, ही जगातील प्रत्येक शांततावाद्याची भूमिका असते. अमेरिकेतील निदर्शनांत ब—ुस स्प्रिंगस्टीन, रॉबर्ट डी निरो अशा नामवंत कलावंतांनीदेखील भाग घेतला.

# ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय पुरस्कार वितरण संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** 29 मार्च रोजी ग. दि .माडगूळकर नाट्य सभागृह निगडी प्राधिकरण पिंपरी चिंचवड या ठिकाणी सकाळी ९ ते १२ व २ ते संध्याकाळी ७ या दोन सत्रांमध्ये ध्येय एज्युकेशन फाउंडेशन तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक ,आदर्श शाळा, आय एम विनर राज्यस्तरीय पुरस्कार , आदर्श पत्रकार, आदर्श टीव्ही चॅनल इत्यादी पुरस्कार वितरण समारंभ प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .





यावेळी आमदार अमित गोरखे , आमदार उमाताई खापरे, शर्मिला बाबर उपमहापौर पिं. चिं. महानगरपालिका ,शुभम पवार उपजिल्हाधिकारी छ.संभाजीनगर, भाऊसाहेब कारेकर शिक्षणधिकारी माध्यमिक ,दत्तात्रय वारे गुरुजी, ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष सुदाम शेंडगे सर, ध्येय अकॅडमी महाराष्ट्र राज्य अध्यक्षा अर्चना शेंडगे मॅडम, राज्य प्रमुख संदीप पाटील, मार्गदर्शक सोमनाथ शिंदे,सचिव सोनाली गाडे मॅडम, ,खजिनदार उर्मिला पाटील, सारिका शिंदे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रभरातील या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, शिक्षक ,संस्थाचालक, ,पत्रकार, यूट्यूब चैनल प्रतिनिधी सर्वांना पुरस्कार शाल ,श्रीफळ व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

यामध्ये 400 शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, 72 शाळा महाराष्ट्रातील आदर्श शाळा पुरस्कार, 02 राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान ,348 महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना 33 लाख शिष्यवृत्ती वाटप करण्यात आले.

ध्येय एज्युकेशन फाउंडेशन तर्फे महाराष्ट्रभरातील गरजू ,गरीब होतकरू विद्यार्थी स्पर्धा परीक्षेमध्ये टिकून राहिले पाहिजे व त्याची पायाभरणी म्हणून ह्या स्पर्धा परीक्षा पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची राज्यभरातून घेतल्या जातात व त्यातून प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक, तृतीय क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात येतो.

2012 पासून प्रत्येक वर्षी हा कार्यक्रम नित्यनेमाने सुरू आहे आतापर्यंत महाराष्ट्रभरातील अनेक विद्यार्थी चांगल्या पद्धतीने घडवलेले आहेत यामुळे हा शिक्षणाचा वारसा सुदाम शेडगे सर आणि त्यांचे सहकारी यांनी मिळून चालवलेला आहे तो कौतुकस्पद आहे पुढे हे अशाच पद्धतीने चालत राहो अशी विद्यार्थी व पालक वर्गातून मागणी येत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी चहापाणी नाश्ता व जेवणाची सोय करण्यात आली होती

## नमस्ते नाशिक फाउंडेशनचा समाज उपयोगी उपक्रम साजरा

महाराष्ट्र जीत

**नाशिक प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** “ पिण्याचे पाणी हे केवळ गरज नाही… तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे!”स्वच्छ पिण्याच्या पाण्यावर समान अधिकार गाजवूया, स्वच्छतेतून आरोग्य आणि आरोग्यातून आनंद निर्माण करूया!महावीर जयंतीच्या पवित्र औचित्यानेनमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने“स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा वापर वाढवूया – पाणी पिण्याचा अधिकार गाजवूया!”



हा समाजोपयोगी उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला दान करून पुण्य कमवा या उपक्रमाअंतर्गत ही वस्तू भेट म्हणून देण्यात आली. गरजू बांधवांना माठ (मटके), मिठाई आणि पिण्याचे ग्लास वाटप करण्यात आले —

फक्त वस्तू नव्हे, तर थंडावा, आदर आणि माणुसकी देण्याचा हा प्रयत्न होता. भगवान महावीरांच्या विचारांतून प्रेरणा घेत —

“जगातील प्रत्येक जीवात स्वतःला पाहा — हीच खरी मानवसेवा”

या तत्वावर चालत, संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून

हा उपक्रम साकार झाला. सप्रे वाडी या गावामध्ये निराधार, गरजू व शेतमजूर कुटुंबांना माठ, मिठाई व ग्लास भेट देण्यात आले. तसेच NAB महाराष्ट्र संकुल येथे अंध बांधवांनाही पिण्याच्या पाण्याचे माठ, मिठाई व ग्लासांचे वाटप करून “सेवा हीच खरी संवेदना” याची प्रचिती देण्यात आली. त्या थंड पाण्याच्या घोटात फक्त तृप्ती नव्हती, तर आधार, आपुलकी आणि माणुसकीचा स्पर्श होता… आणि तोच आनंद प्रत्येक लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता! या उपक्रमासाठी महावीर इंटरनॅशनलचे अनिल नहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी नमस्ते नाशिक फाउंडेशन च्या अध्यक्ष स्नेहल देव

सामाजिक कार्यकर्ते सुनील यलमामे, संगिता बाफना, भंडारी, अनुसया भांसी, दत्तात्रेय गुळवे,अशोक साळुंके, दिगंबर येलमामे,बाळा भाऊ चांदगीर,

कृष्णा तेलंग, तुकाराम येलमामे, Adv रोहिदास तारगे, किशोर बाफना उपस्थित होते “दानातून फक्त वस्तू देऊ नका… भावना द्या, माणुसकी जपा!” “एक माठ — अनेकांच्या आयुष्यातील थंडावा!”

## गिरधारीलाल सारडा यांच्या कडून गरजूंना सिलिंग फॅनचे वाटप

### श्री फाउंडेशन चा प्रेरणादायी उपक्रम



महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** आजच्या या सेवा उपक्रमांतर्गत गरजू आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या आजच्या युगातही ज्यांच्या घरातमध्ये फॅनच उपलब्ध नाही. अशा अतिशय गरीब कुटुंबियांना उन्हापासून त्यांचा बचाव व्हावा या उद्देशाने अशा कुटुंबीयांना श्री फाउंडेशन चे अध्यक्ष श्री गिरधारीलाल सारडा यांच्याकडून ग्रामीण भागातील 30 कुटुंबीयांना ओरिएंट कंपनीच्या सिलिंग फॅनचे वाटप करण्यात आले आहे.यावेळी भारतीय जनता पार्टीअध्यात्मिक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शिवशंकर भोयर रामेश्वर आरू नंदकिशोर आरू सुभाष आरू गजानन राऊत वैभव मेटकर यांची उपस्थिती होती.

श्री फाउंडेशन च्या माध्यमातून उन्हाळ्यात गरजूंना थोडा दिलासा मिळावा म्हणून हा आमचा छोटासा प्रयत्न आहे.श्री फाउंडेशनच्या माध्यमातून समाज उपयोगी कार्य ही संस्था नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत विविध सेवा उपक्रम राबवित असते शिक्षण आरोग्य अन्नधान्य वृक्षारोपण गरजूंसाठी साहित्य अशा विविध माध्यमातून ही संस्था सातत्याने समाज उपयोगी कार्यक्रम राबवीत असते त्याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागातील अतिशय गरीब कुटुंबीयांना तापमानापासून बचाव व्हावा या हेतूने ओरिएंट कंपनीच्या सिलिंग फॅन चे

## महागांव तालुक्यात SIR 2002 Mappingचा बोजवारा

### अधिकारी घरपोच पडताळणीसाठीच आले नाहीत!

**३१ मार्च अंतिम मुदत, पण मतदारांपर्यंत प्रशासन पोहोचलंच नाही; हजारो नावे वगळली जाण्याची भीती**

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे/महागांव :** महागांव तालुक्यात SIR 2002 Mapping प्रक्रियेचा अक्षरशः बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे. शासनाच्या आदेशानुसार मतदारांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करणे अपेक्षित असताना, आजपर्यंत एकही अधिकृत टीम मतदारांच्या दारात पोहोचलेली नाही, अशी धक्कादायक बाब उघड झाली आहे.

दरम्यान, ३१ मार्च ही अंतिम तारीख असल्याचे समजत असून, वेळेअभावी आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे हजारो पात्र मतदारांची नावे मतदार यादीतून वगळली जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गावोगावी नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, “आमच्या दारात अधिकारीच आले नाहीत, मग आमची नावे कशी राहणार?” असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

प्रशासनाकडून केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून दाखवली जात असल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे. प्रत्यक्ष पडताळणी न करता अहवाल तयार केला जात असल्यास, ही संपूर्ण प्रक्रिया संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे.यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन मुदतवाढ जाहीर करावी, तसेच प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन पारदर्शक पद्धतीने पडताळणी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अन्यथा, येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## स्व . सौ . कृष्णाताई नामदेवराव खराटे यांचे स्मृती प्रीत्यर्थ

### श्रीपंचवटी हनुमान संस्थान दत्त कॉलनी कारंजा येथे आ .सईताई प्रकाश डहाके यांचे हस्ते मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन संपन्न

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये / कारंजा लाड:**श्री पंचवटी हनुमान संस्थान दत्त कॉलनी कारंजा येथे दि.३० मार्च रोजी स्व सौ .कृष्णाताई नामदेवराव खराटे यांचे स्मृती प्रीत्यर्थ मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन कारंजा मानोरा मतदार संघाच्या लोकप्रीय आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांचे हस्ते खराटे परीवाराचे उपस्थीत पार पडले .प्रथम आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांनी नामदेवराव खराटे परीवार व दत्त कॉलनी; महाविर कॉलनी वासीयांच्या उपस्थीतीत मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन फीत कापून केले याप्रसंगी त्यांनी शक्तीस्थळ असलेल्या बजरंगबलीचे दर्शन घेतले . या छोटेखानी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी नामदेवराव खराटे गुरुजी तर उदघाटक आमदार श्रीमती सईताई डहाके होत्या . नगर पालीकेच्या भाजपा गटनेत्या सौ शालीनीताई ठाकरे ; नगरसेवक



सौ वैशाली गुल्हाने; सौ ज्योती राठोड; सच्चीतानंद सद्यानी;सागरभाऊ अंभोरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थीती होती . उपस्थीत मान्यवरांचे कॉलनीवासीयां तर्फे स्वागत करण्यात आले . यावेळी आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी देणगीदाता नामदेवराव खराटे गुरुजी यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला . खराटे परीवाराने मंदीर प्रवेशद्वार समर्पीत केल्या बाबत आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी खराटे परीवाराबाबत गौरव उदगार काढले. खराटे परीवारासह कॉलनीवासीयांनी प्रकाश दादावर निस्सीम प्रेम केले याचा पुनरोच्चारआमदार श्रीमती सईताई यांनीआपल्या मनोगतातून व्यक्त केला . नामदेवराव खराटे गुरुजींनी आमदार श्रीमती सईताई यांचे हस्ते प्रवेश द्वाराचे लोकार्पन झाल्याबाबत आनंद व्यक्त केला व माझी संकल्प पूर्ती झाल्याचे समाधान त्यांनी मनोगतातून व्यक्त केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा . सुधीर लूंगे सर यांनी केले . कार्यक्रमाचे बहारदार संचलन मोडक सर यांनी तर आभार प्रदर्शन सतीष खराटे यांनी केले . कार्यक्रमाची सांगता उपस्थितांना थंड पेय शरबत देऊन झाली .याच वेळी दत्तकॉलनी ;महाविर कॉलनीतील रोडचे सुद्धा लोकार्पन आमदार श्रीमती डहाके यांनी केले . कदम बाप्पू यांचे कडे सौ .भावनाताई कदम यांच्या अपघाती निधनामुळे सांत्वनापर भेट दिली .

यावेळी दत्त कॉलनीचे अध्यक्ष ऍड अरुण खंडागळे; प्रवीण कानकीरड; प्रमोद ठाकरे साहेब; रामचंद्र घुले साहेब अशोक देशमुख; अशोक फुके; शासकीय कंत्राटदार अजय वानखडे; प्रा सुधीर लुंगे ; भरत बापू देशमुख इत्यादीनी आ . श्रीमती सईताई यांना घडलेल्या प्रसंगाबाबत अवगत केले .

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# शनिमांडळ परिसरावर निसर्गाची वक्रदृष्टी, गारपिटीने पिकांचे नुकसान

महाराष्ट्र जीत



**नंदुरबार :** नंदुरबार तालुक्याच्या पूर्वभागातील शनिमांडळ गावासह परिसराला सोमवारी सायंकाळी वादळी पावसासह गारपीटीने चांगलेच झोडपले. अर्धातास झालेल्या गारपीटीने परिसरातील कांदा, मका आणि भुईमुगाच्या पिकाला चांगलाच तडाखा बसला असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.नंदुरबार तालुक्याच्या पूर्व भागातील गावांमध्ये वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. परिसरातील शनिमांडळ, तिलाली, तलवाडे, इंदरहट्टी या भागात जवळपास अर्धातास मोठ्या आकाराची गारपीट झाल्याचे पहायला मिळाले. अचानक झालेल्या या गारपीटीच्या पावसाने शेतकरी, व्यावसायिकांची चांगलीच तारांबळ उडाली. गारपीटीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले.गारपीटीमुळे या परिसरात लागवड करण्यात आलेला कांदा. मका, भुईमुग सारख्या पिकाला चांगलाच तडाखा बसला. अवघ्या पंधरा दिवसावर काढणीला आलेल्या कांद्याला गारपीटीचा फटका बसल्याने एकरामागे लाख रुपयांचा खर्च करुनही अवकाळीत सापडलेल्या कांद्याला आता कवडीमोल भाव मिळण्याचा धोका आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जावून पीक नुकसानीची मंगळवारी माजी खासदार डॉ. हिना गावित यांनी पाहणी केली. त्यांच्या समवेत महसूल आणि कृषी विभागाचे अधिकारी होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट नुकसानीच्या पंचनाम्याच्या सूचना यंत्रणेला दिल्या. या परिसरात कांदा पिकाची मोठी लागवड होत असल्याने सर्वाधिक फटका हा कांदा पिकाला बसला आहे.

शासन स्तरावर लवकरात लवकर पंचनामे पूर्ण करुन शेतकऱ्यांना भरघोस मदत देवून त्यांना आधार देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे यावेळी हिना गावित म्हणाल्या. हिना गावित यांचे वडील डॉ. विजयकुमार गावित या परिसराचे आमदार असून त्यांच्यावर मोठी शस्त्रक्रीया झाली असल्याने दोन ते तीन महिन्यापासून ते मुंबईत आहेत. त्यामुळे त्यांच्यावतीने हिना गावितांनी पीक नुकसानीची पाहणी केली.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संयोगीताराजे छत्रपती यांची नियुक्ती करावी

## महाराष्ट्रभरातून मागणी जोर धरते

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अब्दुल जुबेर :** महाराष्ट्रातील राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी युवराज्ञी संयोगीताराजे छत्रपती यांची नियुक्ती करावी, अशी मागणी आता राज्यभरातून जोर धरत आहे. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे विदर्भ निमंत्रक अनिल पाटील यांच्यासह अनेक शिवभक्त आणि विविध स्तरांतील नागरिकांनी ही मागणी पुढे रेटली आहे.

न्याय आणि स्त्रीसक्षमीकरणासाठी ठाम भूमिका घेणारे नेतृत्व म्हणून युवराज्ञी संयोगीताराजे यांच्याकडे पाहिले जात आहे. त्या संभाजीराजे छत्रपती यांच्या धर्मपत्नी असून, छत्रपती घराण्याच्या परंपरेतून आलेल्या संस्कारांचा ठसा त्यांच्या कार्यातून दिसून येतो. महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी संवेदनशील आणि प्रभावी नेतृत्व देण्याची क्षमता त्यांच्यात असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.



स्वराज्य पक्षाचे राज्य सदस्य गोपाल भिसडे यांनीदेखील या मागणीला पाठिंबा देत, "राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी संयोगीताराजे छत्रपती यांची नियुक्ती ही संविधानिक पदाला न्याय देणारी ठरेल," असे मत व्यक्त केले.

दरम्यान, रायगडावर दरवर्षी होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळा या भव्य सोहळ्याचे त्यांनी केलेले नियोजन, तसेच गड-दुर्ग संवर्धन, स्वच्छता अभियान आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये महिलांचा वाढता सहभाग यामुळे त्यांचे नेतृत्व अधोरेखित झाले आहे. महिलांना नेतृत्वाच्या संधी देत "स्त्री-पुरुष समानतेचा" विचार त्यांनी



कृतीतून सिद्ध केल्याचेही सांगितले जाते.

तसेच, कोल्हापूरमधील महालक्ष्मी मंदिर परिसरात नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरातील महिलांना एकत्र आणून त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याचे उल्लेखनीय कार्यही त्यांनी केले आहे.

राज्यात महिलांवरील वाढत्या



अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर ठाम, निर्भय आणि संवेदनशील नेतृत्वाची गरज व्यक्त होत आहे. अशा परिस्थितीत संयोगीताराजे छत्रपती यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करावी, ही मागणी आता राजमाता राजमाता जिजाऊंचे वंशज मंगला भारत जाधव सृष्टी भारत जाधव रितू अनिल पाटील प्राची पाटील शारदा हलवणे मंगला जाधव साधना शिंदे कार्तिक पाटील शिवकन्या सृष्टी रवी पाटील संदीप लहाने वैभव शिंदे तुषार पारे प्रवीण हिवाळे सर्व व तसेच विदर्भातील महिला तरुण सामान्य जनतेची ठाम भूमिका बनत चालली आहे.

# हळद काढणी पश्चात व्यवस्थापन तंत्रज्ञानावर मार्गदर्शन प्रशिक्षण संपन्न

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** कृषी विज्ञान केंद्र, वाशिम व नवचैतन्य शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २७ मार्च रोजी सावरगाव जिरे, ता. जि. वाशिम येथे प्रगतिशील शेतकरी श्री. गजानन लक्ष्मण नागुलकर यांच्या शेतावर "हळद काढणी पश्चात तंत्रज्ञान" या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर.एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्री. गंगाराम पडघान उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष श्री. सोपान पाटील तसेच उपसरपंच श्री. बबन सावळे यांनी सहभाग नोंदविला. तांत्रिक मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्रातील उद्यानविद्या तज्ञ श्री. निवृत्ती पाटील व नवचैतन्य शेतकरी



उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी श्री. कृष्णा मानवतकर उपस्थित होते.

प्रशिक्षणादरम्यान श्री. निवृत्ती पाटील यांनी हळद पिकाच्या काढणीची योग्य अवस्था, काढणीची वैज्ञानिक पद्धत, उकळणी, वाळवणी, पॉलिशिंग यांसारख्या काढणी पश्चात प्रक्रिया तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठी योग्य बेणे निवड, मातृकंद वापरण्याचे महत्त्व, तसेच साठवणूक व्यवस्थापन यावरही विशेष भर देण्यात आला. यावेळी श्री. कृष्णा मानवतकर यांनी हळद पिकातील एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, मृदा स्वास्थ्य सुधारण्यासाठी जिप्समच्या वापराचे महत्त्व, तसेच उत्पादन व गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक कृषी तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात सरपंच श्री. गंगाराम पडघान यांनी शेतकऱ्यांनी काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास हळदीची गुणवत्ता सुधारून बाजारात अधिक दर मिळण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दीपक इडोळे यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन श्री. सुनील कोल्हे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. फकीरा काका वानखडे, श्री. सुनील वानखडे, पडघान कुटुंब तसेच उपस्थित शेतकरी बांधवांनी मोलाचे सहकार्य केले.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रिसोड तालुक्यातील मोरगव्हाण येथे शेतकरी अभ्यासिकेचे उद्घाटन संपन्न

## मोरगव्हाण येथे महाराष्ट्रातील पहिली शेतकरी अभ्यासिका- राज्य प्रशिक्षक प्रविण पट्टेबहादुर

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी) :** रिसोड तालुक्यातील ग्राम मोरगव्हाण येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रामविकासाचे विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविल्या जात आहेत.या गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सहभाग घेतलेला आहे.त्याच अनुषंगाने गावात विविध उपक्रम प्रत्यक्ष दर्शी राबवली जात आहेत. दिनांक 31 मार्च रोजी शेतकरी बांधवांसाठी शेतकरी अभ्यासिका स्थापन करण्यात आली. या अभ्यासिकेची उद्घाटन झाले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रविण पट्टेबहादुर राज्यस्तरीय प्रशिक्षक यशदा पुणे हे होते.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच शेषराव कोकाटे हे होते. यावेळी या उद्घाटन कार्यक्रमाला गावातील शेतकरी व स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे युवक मोठ्या संख्येने



उपस्थित होते.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत असताना प्रवीण पट्टेबहादूर यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी अभ्यासिका ही महाराष्ट्रातील पहिली अभ्यासिका असू शकते ? असे म्हटल्यास वावगे ठरू नये. खरोखरच मोरगव्हाण ग्रामपंचायत ग्राम विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे. येथील कर्तव्यदक्ष सरपंच व कर्तव्यदक्ष ग्रामपंचायत अधिकारी देवानंद अंभोरे हे सर्व ग्रामस्थांना सोबत घेऊन लोक सहभागातून गावात विविध विकासात्मक व शासनाच्या विविध कल्याणकारी अभियानामध्ये तसेच



शासनाच्या उपक्रमात सहभागी होऊन गावाचा विकास साधत आहेत.मोरगव्हाण ग्रामपंचायतच्या पुढील विकासात्मक वाटचालीसाठी प्रविण पट्टेबहादुर राज्यस्तरीय प्रशिक्षक यशदा पुणे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. या शेतकरी अभ्यासिका उद्घाटन कार्यक्रमाला गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शेषराव कोकाटे यांनी मानले.

# जिल्हाधिकाऱ्यांची गॅस एजन्सीला भेट; ग्राहकांशी संवाद

## गॅस वितरणाचा दैनंदिन आढावा, अनावश्यक गर्दी टाळण्याचे आवाहन




महाराष्ट्र जीत

**अकोला जिल्हा प्रतिनिधी दानिश चौधरी** : जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी गॅस एजन्सीला भेट देऊन गॅस सिलेंडर वितरणाचा आढावा घेतला. नागरिकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून पेट्रोलियम कंपन्यांशी दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. नागरिकांनी गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले.


जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र यन्नावार व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. एचपी अकोला गॅस एजन्सी तसेच मालीवाल भारत गॅस एजन्सी येथे भेट देऊन वितरणाबाबत आढावा घेण्यात आला. घरगुती गॅसचा तुटवडा नसून ग्राहकांची केवायसी सुध्दा होत आहे.

गॅस एजन्सीमध्ये गॅस घेण्याकरिता आलेल्या नागरिकांसोबत जिल्हाधिका-यांनी संवाद साधला. नागरिकांच्या गॅस सिलेंडर वितरणाबाबत विचारणा करण्यात आली. गॅस सिलेंडर वेळेत मिळत असल्याबाबत नागरिकांनी सांगितले.भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता नागरिकांनी गॅस एजन्सीमध्ये अनावश्यक गर्दी करू नये. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. शासन, प्रशासन आपल्या सोबत आहे, नागरिकांना वेळेत गॅस सिलेंडर उपलब्ध करण्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात येत असून पेट्रोलियम कंपन्यांशी दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे याबाबत आवाहन यावेळी करण्यात आले.

# वसूर फाटा येथील श्री संतसेवालाल महाराज यांचे लावण्यात आलेले फलक अनाधिकृत

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी/संघपाल मदने :** मुखेड तालुक्यातील मौजे वसूर जिल्हा नांदेड येथील सर्वे नंबर ९९ गट नंबर ३४७ या जमिनीचे कब्जेदार व मालक गणपत इरबा शिंदे, पांडुरंग इरबाजी शिंदे, झरीबा इरबा शिंदे (मयत) व त्यांचे वारसदार व हकदार आहेत या जमिनीवर १९६५ ते २०२६ आज तागायत पर्यंत वहिवाट करीत आहेत वही वाट करीतआहेत या जमिनीचे टोच नकाशा व चतू: सीमा याप्रमाणे आहे पूर्वेस बिल्लाळीची शिव उत्तरेस पिंपळकुंट्याचे शिव दक्षिणेस सर्वे नंबर



१०० व गट क्रमांक ३४६ पश्चिमेस सर्वे नंबर ९८ व गट क्रमांक ३४८ या चतू: सीमेमधील एकूण ११ हेक्टर ७७ आर ही जमीन आमची असून आमच्या वडिलोपार्जित आत्ताही आमची तिसरी पिढीआहे या ठिकाणी कास्त करून उपजीविका भागवीत आहोत कास्तकार ईऱ्या पिऱ्या पासून ते झरीबा इरबा, गणपत ईरबा, पांडुरंग इरबा व त्यांचे वारस प्रभाकर झरीबा शिंदे, वसंत झरीबा शिंदे, देवेंद्र गणपत शिंदे, प्रदीप गणपत शिंदे, अनिल पांडुरंग शिंदे, अमोल पांडुरंग शिंदे, किरण पांडुरंग शिंदे, अविनाश पांडुरंग शिंदे . हे खालील प्रमाणे वारसदार असून या जमिनीचे एवढे वारसदार असून परवा जे राष्ट्रसंत सेवालाल महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून वसुर फाटा येथे अनाधिकृतपणे फलक लावण्यात आलेले आहे तरी या जमिनीचे मालक व कब्जेदार असताना ग्रामपंचायत मध्ये अनादीकृतपणे वसुर ग्रामपंचायत डून अनाधिकृत पणे उपलब्ध सेवागढ करून देण्यात आलीआहे तरी ग्राम विस्तार अधिकारी वसुर व तहसीलदार साहेब मुखेड , वसूर फाटा येथे श्री संत सेवालाल महाराज यांचे जे अनाधिकृत पणे लावण्यातआलेले आहे तरी याची योग्य ती चौकशी करून कार्यवाही करण्यात यावे व त्या ठिकाणी लावलेले फलक काढण्यात यावे.

# माहूर तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

## दि 2 रोजी आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा

महाराष्ट्र जीत

**श्रीक्षेत्र माहूर/ सुभाष खडसे :** नांदेड क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत तालुका क्रीडा संकुल माहुरचा भुमीपुजन सोहळा आमदार भिमराव केराम विधानसभा सदस्य तथा अध्यक्ष तालुका क्रीडा संकुल समिती माहूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. याप्रसंगी तालुका क्रीडा संकुल समितीचे सन्माननिय सदस्य व स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध दैनिकाचे प्रतिनिधी व विविध खेळातील खेळाडू यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.02 एप्रिल 2026 रोजी दु. 1.00 वा. तालुका क्रीडा संकुल मैदान पांडवलेनी शासकीय आदिवासी आश्रम शाळेजवळ माहूर येथे संपन्न होणार आहे.

तालुका क्रीडा संकुल, माहूर करीता गायरान गट क्रं. 195 मधील क्षेत्र 1 हेक्टर 46 आर. शासकीय जागा प्राप्त आहे. सदर जागेवर क्रीडा सुविधेचे बांधकाम करणेकरीता रु 499.88 लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. यामध्ये मल्टीपर्पज इनडोअर हॉल 200 मी. धावनपथ कबडडी खो-खो व्हॉलीबॉल मैदान सिमेंट रोड व इतर कामे संरक्षण



भिंत वॉचमन रुम गेट व इतर पाण्याची व्यवस्था अग्नीशमक ड्रेनेज लाईन सेप्टी टँक बोरवेल व इतर अनुषंगीक कामे इत्यादी बाबीचा समावेश आहे.

सदर भुमीपूजन सोहळा संपन्न झाल्यानंतर लवकरच कामास सुरुवात करण्यात येणार असून तालुक्यातील खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय दर्जाच्या अदयावत क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. या भुमीपूजन सोहळयास तालुक्यातील खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमी, विविध संघटनेचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तालुका क्रीडा अधिकारी बालाजी शिरसीकर यांनी केले आहे.

# पनवेल आगारात ARTFX स्कूल ऑफ ॲनिमेशनचा स्तुत्य उपक्रम

महाराष्ट्र जीत

**पनवेल(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) :** ARTFX स्कूल ऑफ ॲनिमेशन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पनवेल आगारात प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच परिसर सुशोभीकरणासाठी एक उपयुक्त आणि सामाजिक जाणीव वाढवणारा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत पनवेल आगारामध्ये विविध ठिकाणी दिशादर्शक आणि सूचना फलक उभारण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांना आगारात सहजपणे मार्गदर्शन मिळणार असून, त्यांचा वेळ वाचण्यास आणि गैरसोय टाळण्यास मोठी मदत होणार आहे. पनवेल आगारात दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी ये-जा करत असतात. अनेक वेळा योग्य माहिती अभावी प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन ARTFX स्कूल ऑफ ॲनिमेशन यांनी पुढाकार घेत हा उपक्रम हाती घेतला. "प्रवाशांना पनवेल आगारामध्ये अधिक स्पष्ट सूचना फलक लावण्यात यावेत, जेणेकरून त्यांना योग्य दिशा व माहिती सहज मिळेल," असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.










या कार्यक्रमावेळी पनवेल आगार व्यवस्थापक श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे तसेच वाहतूक नियंत्रण अधिकारी श्री. सतीश नलावडे उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत, अशा प्रकारचे उपक्रम सार्वजनिक ठिकाणांसाठी अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. प्रवाशांना योग्य दिशा व माहिती मिळावी यासाठी उभारण्यात आलेले हे फलक विशेष उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी श्री. अजय अंकुश पाटील (संचालक, ARTFX स्कूल ऑफ ॲनिमेशन) यांचा पनवेल आगार प्रशासनाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे आणि श्री. सतीश नलावडे यांनी त्यांना सन्मानित करून या उपक्रमासाठी कृतज्ञता व्यक्त केली. या सन्मानामुळे संस्थेच्या सामाजिक कार्याची दखल घेतली गेल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.या उपक्रमात ARTFX स्कूल ऑफ ॲनिमेशनचे सहकारी श्री. सतीश पाटील, झाकीर सोठिया, संचिता सचिन भंडारी आणि श्री. गणेश पाटील यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला. फलकांची रचना आणि मांडणीही आकर्षक व समजण्यास सोपी ठेवण्यात आली आहे.या उपक्रमामुळे पनवेल आगार अधिक सुव्यवस्थित, स्वच्छ आणि प्रवाशांसाठी अनुकूल बनत आहे. केवळ सुशोभीकरणापुरता मर्यादित न राहता, हा उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा एक प्रयत्न ठरत आहे. भविष्यातही अशा प्रकारचे उपक्रम राबवून सार्वजनिक ठिकाणांचा विकास साधण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# श्याम सवाई यांचा सत्कार, व्यसनमुक्तीच्या कार्याची दखल

## समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून व्यसनमुक्तीचा संदेश देण्याची ग्वाही

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** समाजातील व्यसनमुक्ती चळवळीला बळकटी देत उल्लेखनीय कार्य करणारे श्यामभाऊ सवाई यांना महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण विभागाकडून 'महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार' प्रदान झाल्यानंतर कारंजात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. ३० मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृहात बहुजन पत्रकार संघाच्या वतीने पार पडलेल्या या कार्यक्रमाने सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव करणारा एक प्रेरणादायी क्षण अनुभवायला मिळाला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्याम सवाई यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी सभागृहात टाळ्यांचा कडकडाट होत सवाई यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात त्यांनी केलेले सातत्यपूर्ण प्रयत्न, जनजागृती मोहिमा आणि समाजातील युवकांना योग्य दिशेने वळविण्याचे कार्य यामुळे त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.यावेळी तहसीलदार रवी महाले, नायब तहसीलदार विनोद हरणे, लक्ष्मण बनसोडे तसेच मंडळ अधिकारी महेश धानोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच बहुजन पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष बंडूभाऊ इंगोले, अखिल भारतीय पत्रकार संघाचे सुधीरभाऊ देशपांडे,





'दैनिक देशोन्नती'चे तालुका प्रतिनिधी विजय काळे, 'दैनिक सकाळ'चे अनंत सुपणर, ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अशोक उपाध्ये यांच्यासह विविध माध्यमांचे पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या भाषणात सवाई यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, आजच्या काळात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत असताना अशा सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. सवाई यांनी केवळ जनजागृती केली नाही, तर अनेक कुटुंबांना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढून त्यांना नवजीवन दिले आहे, हे कार्य समाजासाठी आदर्श ठरणारे आहे.

सत्काराला उत्तर देताना श्याम सवाई यांनी नम्रपणे हा सन्मान समाजातील सर्व सहकाऱ्यांचा असल्याचे सांगितले.तसेच व्यसनमुक्त समाज हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली आहे. पुढील काळातही मी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून व्यसनमुक्तीचा संदेश देत राहीन, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच युवकांनी व्यसनापासून दूर राहून शिक्षण व सकारात्मक कार्यात स्वतःला गुंतवावे, असे आवाहनही त्यांनी केले. उपस्थितांनी सवाई यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन विजय भड यांनी केले तर आभार हेमंत पापडे यांनी मानले. कार्यक्रमाला तालुक्यातील पत्रकारांची मोठी उपस्थिती होती.

# हिंद टर्मिनल कंपनीने अडविला शेतकऱ्यांचा पारंपारिक मार्ग !

## शेतावर जाण्याचे मार्ग खुले करावेत. कळंबुसरे-चिरनेर शेतकऱ्यांची मागणी

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील कळंबुसरे चिरनेर हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंद टर्मिनल कंपनीने घातलेल्या संरक्षण भिंतीमुळे कळंबुसरे व चिरनेर शेतकऱ्यांचे शेतावर जाण्याचेसर्व पारंपारिक मार्ग बंद झाले आहेत. त्याच प्रमाणे कंपनीने संपादित केलेल्या जमिनीवर टाकलेल्या भरावामुळे शेतीतील पाण्याचा निचरा होण्याचे पारंपारिक नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे भात लागवडीखालील शेतजमिनीतील पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचे भात पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे कंपनीने उभारलेली संरक्षण भिंत तातडीने पाडून, शेतकऱ्यांचे जुन्या पारंपारिक वहिवाटीतील शेतावर येण्या-जाण्याचे मार्ग खुले करण्यात यावेत अशी मागणी कळंबुसरे येथील अक्षय लक्ष्मण केणी व इतर स्थानिक शेतकऱ्यांनी 20 मे. 2025 रोजी उरणच्या तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली होती.

या निवेदनाची दखल घेत मे. तहसीलदार यांनी जुन्या वहिवाटीचे मार्ग पूर्ववत सुरू करण्यात यावे, असे कंपनीला आदेश देऊन देखील कंपनीने शेतकऱ्यांना शेतावर जाण्यासाठी अडथळा ठरणारी संरक्षण भिंत काढून न टाकल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीच्या कामात मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. उरण तालुका कृषीप्रधान तालुका असून येथील शेतकरी अजून भात पिकांच्या शेतीची लागवड करीत आहेत. भाताचे पीक हे येथील शेतकऱ्यांचे महत्वाचे पीक असून, येथील शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे शेतीच्या हिवाळी, उन्हाळी व पावसाळी कामांच्या मशागती साठी ट्रॅक्टर, पावरटिलर या यंत्रसामुग्रीसह शेतीची इतर अवजारे शेतावर नेण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे.

शासन निर्णय क्रमांक जमीन 2015 प्र. क्र. 47 ज-1अ नुसार यंत्रसामुग्री शेतावर जाईल एवढा रस्ता ठेवणे बंधनकारक आहे. त्यामुळे कंपनीने बांधलेली संरक्षण भिंत काढून शेतकऱ्यांचे जुन्या पारंपारिक वहिवाटीचे मार्ग खुले



करण्यात यावेत असे आदेश तहसीलदार यांनी या अगोदरही दिले होते असे अक्षय केणी यांनी निवेदनात म्हटले आहे. उभारण्यात आलेली संरक्षण भिंत कंपनीने तातडीने पाडून शेतकऱ्यांना शेतावर जाण्याचे मार्ग मोकळे करावेत अशी मागणी शेतकरी अक्षय केणी यांच्यासह इतर स्थानिक शेतकऱ्यांनीही केली आहे.

चिरनेर हद्दीत उभारण्यात आलेल्या हिंदू टर्मिनल कंपनीसाठी कळंबूसरे व चिरनेर येथील 37 शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. या संपादित जमिनीत माझी सर्वे नंबर 154/3 ही शेतजमीन असल्याचे अक्षय केणी यांनी सांगितले. मात्र या कंपनीच्या परिसरात अजून काही शेतकऱ्यांच्या भात लागवडीखालील पिकत्या जमिनी शिल्लक आहेत. या शेत जमीनीत दरवर्षी भाताची लागवड केली जाते. मात्र मशागतीची कामे करण्यासाठी शेतावर जाण्यासाठी व मशागतीसाठी लागणारी अवजारे घेऊन जाण्यासाठी रस्ताच उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मशागतीची कामे करण्यासाठी मोठ्या अडचणी येत आहेत. कंपनीला वेळोवेळी सूचना देऊन देखील कंपनी यागोष्टीकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले. याबाबत उरण तहसील कार्यालयात देखील लेखी निवेदन दिले आहे. कळंबुसरे व चिरनेर च्या शेतकऱ्यांची मागणी लवकरात लवकर मान्य करावी आन्यथा सदर कंपनी विरोधात मोठे जन आंदोलन उभारण्या येईल असा इशारा येथील स्थानिक शेतकऱ्यांनी दिला आहे.

# स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा वापर वाढवूया - पाणी पिण्याचा अधिकार गाजवूया!; नमस्ते नाशिक फाउंडेशनचा स्तुत्य उपक्रम

महाराष्ट्र जीत

**निफाड क्रीडा प्रतिनिधी** नाशिक दिनांक ३१ मार्च :- " पिण्याचे पाणी हे केवळ गरज नाही... तो प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे" स्वच्छ पिण्याच्या पाण्यावर समान अधिकार गाजवूया, स्वच्छतेतून आरोग्य आणि आरोग्यातून आनंद निर्माण करूया.

या उपक्रमांतर्गत महावीर जयंतीच्या पवित्र औचित्याने नमस्ते नाशिक फाउंडेशन, नाशिक यांच्या वतीने "स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा वापर वाढवूया – पाणी पिण्याचा अधिकार गाजवूया" हा समाजोपयोगी उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. दान करून पुण्य कमवा या उपक्रमाअंतर्गत या वस्तू भेट देण्यात आल्या. गरजू बांधवांना माठ (मटके), मिठाई आणि पिण्याचे ग्लास वाटप करण्यात आले. फक्त वस्तू नव्हे, तर थंडावा, आदर आणि माणुसकी देण्याचा



हा प्रयत्न होता. भगवान महावीरांच्या विचारांतून प्रेरणा घेत "जगातील प्रत्येक जीवात स्वतःला पाहा, हीच खरी मानवसेवा" या तत्वावर चालत, संस्थेच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकार झाला.

सप्रे वाडी या गावामध्ये निराधार, गरजू आणि शेतमजूर कुटुंबांना माठ, मिठाई आणि ग्लास भेट देण्यात आले. तसेच नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड (NAB), महाराष्ट्र संकुल येथे अंध बांधवांनाही पिण्याच्या पाण्याचे माठ, मिठाई आणि ग्लासांचे वाटप करून "सेवा हीच खरी संवेदना" याची प्रचिती देण्यात आली. या थंड पाण्याच्या घोटात फक्त तृप्ती नव्हती, तर आधार, आपुलकी आणि माणुसकीचा स्पर्श होता, आणि तोच आनंद प्रत्येक लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. या उपक्रमासाठी महावीर इंटरनॅशनलचे अनिल नहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्ष स्नेहल देव, सामाजिक कार्यकर्ते सुनील यलमामे, संगिता बाफना, भंडारी, अनुसया भानसी, दत्तात्रेय गुळवे,अशोक साळुंके, दिगंबर येलमामे, बाळाभाऊ चांदगीर, कृष्णा तेलंग, तुकाराम येलमामे, ॲड. रोहिदास तारगे, किशोर बाफना उपस्थित होते "दानातून फक्त वस्तू देऊ नका, भावना द्या, माणुसकी जपा!" "एक माठ हा अनेकांच्या आयुष्यातील थंडावा" अश्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

# नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर भीषण अपघात

## मद्यधुंद कंटेनर चालकाचा कहर, तिघे जखमी – एकाची प्रकृती गंभीर

महाराष्ट्र जीत

**निफाड तालुका प्रतिनिधी :-** नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून आज पुन्हा एक भीषण अपघात घडला. मद्यधुंद अवस्थेतील कंटेनर चालकाने नियंत्रण गमावून दोन वाहनांना जोरदार धडक दिल्याने तिघेजण जखमी झाले असून, त्यापैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

ही घटना आज दुपारी सुमारे २ वाजून ३ मिनिटांच्या सुमारास हॉटेल वेदांत जवळ, येथे घडली. विंचूरकडून नाशिकच्या दिशेने जाणारी स्कार्पिओ (MH 15 EF 2791) व मोटारसायकल (MH 15 KJ 0938) मार्गावरून जात असताना, समोरून भरधाव येणाऱ्या कंटेनरने अचानक नियंत्रण गमावून दोन्ही वाहनांना जोरदार धडक दिली.

या अपघातात दुचाकीवरील पाटोदा येथील वैभव पगारे व रोहित वाघ हे दोघे



जखमी झाले. अपघाताचा जोर इतका होता की दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत जखमींना विंचूर येथील रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर वैभव पगारे व रोहित वाघ यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथे हलविण्यात आले आहे. जखमींपैकी एका व्यक्तीची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे.

अपघातामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. संबंधित कंटेनर चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पुढील तपास सुरू केला आहे.महामार्गावरील सुरू असलेली कामे, बेजबाबदार वाहनचालक व वाहतूक नियमांचे उल्लंघन यामुळे अपघातांची संख्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.